**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२४** **दिनांक : २५ /०२/२०२५**

**विभाग** : सार्व.बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या पर्यटन विकास कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करणेस महासभेची मंजूरी बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,

**संदर्भ:-**१.शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग,टिडीएस -२०१०/८/प्र.क्र.४६३/पर्यटन,दि.०४/११/२०१०

**२.**शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतील कार्यविभाग या कार्यालयाचे पत्र क्र टिडीएस -२०२४ /५४/प्र.क्र.२५१/पर्यटन,दि.२०/०६/२०१४

**३.**शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतीक विभाग क्र.टिडीसी- २०१५/०७ /प्रक्र५७९ दि.३०/०६/२०१६

**४.**शासननिर्णय पर्यटन व सांस्कृतीक कार्यविभाग या कार्यालयाचे पत्र क्र.टिडीएस-२०२१/०१/प्र.क्र.४२/पर्यटन दि.१९/०१/२०२१

**५.**शासन परिपत्रक,पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग क्र.टीडीएस-२०२१/०१/प्र.क्र.४२/पर्यटन दि.१२/०७/२०२२

**६.**मा.आ.संग्राम जगताप,यांचे पत्र क्र.२०५/१/२४ दि.११/०३/२०२४.

**७.**मा.सहाय्यक संचालक(पर्यटन) नाशिक,यांचेकडील पत्र क्र.प.सं./विकास/नाशिक विभाग/४/प्र.क्र.८/२०२४ दि.१४/०८/२०२४

**८.**मा.जिल्हा नियोजन अधिकार,जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.जिनिस/पर्यटन/ससंअ-१/१२११/२०२४ दि.१९/०८/२०२४

विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,उक्त योजनेअंतर्गत संदर्भ क्र.६ अन्वये मा.आ.श्री.संग्राम अरूणकाका जगताप,विधानसभा,नगर शहर यांनी खाली नमुद काम प्रस्तावित करणेबाबत कळविले आहे.तया अनुषंगाने संदर्भ क्र.८ नुसार मा.जिल्हा नियोजनअधिकारी,जिल्हाधिकारी कार्याल,अहिल्यानगर यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करणे बाबत आदेशित केले आहे. त्यानुसार सदर कामाचे प्रत्यक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच कामांची व्दिरूक्ती होणार नाही,याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | मंजूर रक्कम (आकडे लाखत) | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भिस्तबाग महाल सुशोभिकरण करणे | ३००.०० | २,९८,९३,८६०/- |
| २ | केडगांव ते मेहेरबाबा समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता करणे | २००.०० | १,९९,९६,६३५/- |
| | एकुण | ५००.०० | ४,९८,९०,४९५/- |

याकामी शासन निर्णयाच्या अनुषंगाने मागणीनुसार प्रपत्र"अ",प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

तरी सदर कामाचा रक्कम रू. ४,९८,९०,४९५/-(अक्षरी रक्कम रू.चार कोटी अठ्ठयान्नव लाख नव्वदहजार चारशे पंच्यान्नव मात्र) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी (नियोजन),अहिल्यानगर यांचेकडेस सादर करणे कामी मा.प्रशासकीय महासभेची मंजुरी देणेत येत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२५** **दिनांक : २५ /०२/२०२५**
**विभाग** : प्रकल्प विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिटी सर्व्हे नं.६४६६,७५४७,७१८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायीक जागा/शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणेबाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सिटी सर्व्हे नं. ६४६६,७५४७,७१८९ (सर्जेपुरा) या ठिकाणी सद्यस्थीत रंगभवन नाट्यगृह व शॉपिंग कॉम्प्लेक्स अस्तित्वात आहेत. सदरची इमारत ही अंदाजे ४० ते ५० वर्षे इतकी जुनी आहे. सदर इमारतीमध्ये पूर्व-दक्षिण व उत्तर बाजूने शॉपिंग कॉम्पलेक्स असून त्या ठिकाणी मनपामार्फत करारनामा करून गाळे भाडेतत्वावर देण्यात आले होते.याबाबत मार्केट विभागप्रमुख यांच्याशी संपर्क साधला असता,सद्यस्थीत सर्व गाळेधारकांचे करारनामे संपुष्टात आल्याचे समजते.

इमारतीच्या पुर्व बाजूस अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेले खुले नाट्यगृह आहे. या ठिकाणी २०१३ साली बांधकाम विभाग मनपा मार्फत काही प्रमाणात दुरूस्तीचे काम करण्यात आले होते. मागील अनेक वर्षापासून सदरचे नाट्यगृह बंद अवस्थेत आहे .सदरचे नाट्यगृह नव्याने विकसित करणेबाबत नगर शहरातील नाट्यप्रेमी संस्थेचे प्रतिनिधी मनपाकडेस पाठपुरावा करीत आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी संदर्भिय बैठकीमध्ये सर्जेपुरा रंगभवनची जुनी इमारत पाडून याठिकाणी अद्ययावत पद्धतीने आवश्यक त्या पार्किंग व्यवस्थेसह बंदीस्त नाट्यगृह व व्यावसायिक क्षेत्र/कमर्शियल कॉम्प्लेक्स विकसित करणेबाबत निर्देश दिले आहेत. सदर जागेचे प्राप्त अभिलेख पाहता सिटी सर्व्हे नं. ६४६६,७५४७,७१८९ या ठिकाणाचे मालमत्तापत्रकानुसार एकूण क्षेत्रफळ खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | ६४६६ | १००.३० चौमी |
| २ | ७५४७ | २४८१.६०चौमी |
| ३ | ७१८९ | १३९३.००चौमी |
| | **एकूण** | **३९७४.९०चौमी** |

या नुसार सदर ठिकाणी एकुण ३९७४.९० चौमी क्षेत्र उपलब्ध आहे. सदर ठिकाणी नव्याने प्रकल्प विकसित करणे व अनुदान उपलब्धतेसाठी प्रस्ताव मा. शासनाकडेस पाठविणे आवश्यक आहे. या बाबी धोरणात्मक असल्याने निर्णय घेणेकरीता प्रस्ताव मा. महासभेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदरकामी सर्जेपुरा रंगभवन येथे आधुनिक पद्धतीचे वाहनतळ व्यवस्थेसह नाट्यगृह उभारणे व व्यावसायिक जागा/,कमर्शिअल शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे करीता सविस्तर प्रकल्प अहवाल, नकाशा व अंदाजपत्रक तयार करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

करिता

१) सर्व्हे नं. ६४६६,७५४७,७१८९ सर्जेपुरा रंगभवन या ठिकाणी नव्याने नाट्यगृह,कमर्शिअल शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करणेस.

२) सदर कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून, स्पॅनेक्स एईसी या एजन्सीची नियुक्ती करणेस.

वरील धोरणात्मक निर्णय घेणेबाबत प्रस्ताव मा. महासभेकडेस सविनय सादर.येणे प्रमाणे मा उप अभियंता,प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केला असता त्यावर, मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,१.नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा.२.टिपणीत१.येथे नमुद केलेनुसार सदरचा प्रस्ताव शासनाच्या कोणत्या योजनेअंतर्गत सादर करायचा आहे ते नमुद करावे.३.एकुण किती खर्च अपेक्षित आहे ते नमुद करावे.४.१००टक्के अनुदानावर आहे किंवा मनपा हिस्सा भरावा लागणार आहे ते नमुद करावे.५.टिपणीत २.येथे नमुद केलेनुसार स्पॅनेक्स एईसी यांची नेमणूक काय आधारे करत आहेत ते नमुद करावे.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभाग यांचा अभिप्राय की,सदर प्रस्तावाचा अंतर्गत स.न.६४६६,७५४७,७१८९ सर्जेपुरा रंगभवन येथे नाटयगृह व कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसीत बाबत मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी उपस्थित कोणत्या मुद्दा १ बाबत आपला अभिप्राया देणेस विनंती आहे.

यावर मा.सहाय्यक संचालक ,नगररचना यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी अभिप्राय की,तत्कालीन अहमदनगर महानगरपालिकेने स.न.६४६६,७५४७,७१८९ येथील स्वमालकीचे जागेत रंगभवन नाटयगृह व शॉपिंग कॉम्पेक्स बांधलेले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे विकास योजना मंजुर आराखडयात उक्त जागा आरक्षण क्र.११९ नुसार कल्चरल सेंटर म्हणून दर्शविण्यात आलेले आहे.

सदर रंगभवन नाटयगृह व शॉपिंग सेंटरची इमारत ही अंदाजे ४० ते ५० वर्षापुर्वीची असल्याने उपअभियांता प्रकल्प विभाग,अहिल्यानगर महानगरपालिका यांनी प्रस्तावित केल्यानुसार सदर कॉम्प्लेक्स विकसीत करणे बाबतचा प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.फेरसादर,

मा.मुलेप यांनी उपस्थित केलेल्या मुदयांचा खुलासा खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

मा. मुलेप यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

१) मुद्दा क्र. १ बाबत मा. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे.

२) सदर प्रस्ताव मा. शासनाच्या नगरोत्थान (राज्यस्तर /जिल्हास्तर ) / डिपीडीसी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेला असुन त्यानुसार निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

३) सदर प्रकल्पा करीता प्रथमता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारची नेमणुक करुन सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे. या करीता अनुज्ञेय असलेल्या एफएसआय वापरण्यात येणार आहे. मंजुर नकाशानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार केले नंतरच खर्चाचा अंदाज येईल.

४) सदरचा प्रकल्प शासनाच्या कुठल्या योजने अंतर्गत मंजुर होईल व त्याची अनुदान वितरण पध्दत कशी आहे यावर अवलबूंन आहे. सन २०२५-२६ या अंदाजपत्रकामध्ये मनपा हिश्शातुन १.०० कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

५)



६) स्पॅनेक्स एईसी या संस्थेची निवड मनपाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारच्या पॅनलवर करण्यात आली आहे. त्यानुसारच स्पॅनेक्स एईसी यांच्या नेमणुकीची शिफारस करण्यात आलेली आहे.

तरी सर्व्हे नं. ६४६६,७५४७,७१८९ सर्जेपुरा रंगभवन या ठिकाणी नव्याने नाट्यगृह,कमर्शिअल शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणेस व सदर कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून, स्पॅनेक्स एईसी या एजन्सीची नियुक्ती करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२६** **दिनांक : २५ /०२/२०२५**

**विभाग** : सार्व.बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित विकास कामांचा प्रकल्प अहवाल प्रशासकिय मान्यता मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचे मंजूरीसाठी सादर करणेस मा.महासभेची मंजूरी बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,

**संदर्भ :-**

१.नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक धोरण -१९१७/प्र.क्र.९६/न.वि.-१६ दि.१२ डिसेंबर २०१७

२.नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक धोरण -१९१७/प्र.क्र.९६/न.वि.-१६ दि.३० सप्टेंबर २०२०

३.शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.९६/१ न.वि.-१६ दि.२४ एप्रिल २०२३

४.शासन निर्णय क्रमांक मनपा -२०२३/प्र.क्र.८२०(अ-७९) /नवि -१६ (ई -ई -६९७५२७) मंत्रालय,मुंबई दि.२६ऑगस्ट २०२४

५.शासन शुध्दीपत्रक क्रमांक मनपा २०२३/प्र.क्र.८२० (अ-७९) /नवि -१६ (ई -ई -६९७५२७) दि.२९ ऑगस्ट २०२४

६.मा.आयुक्त तथा प्रशासक,मनपा,अहिल्यानगर यांचे दि.२३/०२/२०२५

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचया विकासासाठी विशेष अनुदान देण्यात येते याबाबतची कार्यपध्दती संदर्भातीन क्र.(१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेले आहे.अहिल्यानगर महानगरपालिकेस खाली नमुद कामांसाठी संदर्भाधिन क्र.४ नुसार रू.१००.०० लक्ष मंजुर करण्यात आलेले आहेत. यासाठी १००% निधी राज्य शासन देणार आहे. तथापि संदर्भिय क्र.५ चे शुध्दीपत्रकान्वये खाली नमुद कामे सुचित करण्यात आलेली आहेत.

संदर्भाधीन पत्र क्र.४नुसार योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

८(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. कामाचे स्वरूप सार्वजनिक असावे.तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरीकांच्या प्राथमिक सोर्यी सुविधांमध्ये भर पडणार आह.याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरूपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पांतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाची सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क)सदर प्रकल्पांतर्गतच्या कामांना ई - निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. या बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(ड) सदर प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याचे उष्टीष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे,काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजुर कामावरच मंजुर निधी खर्च झाला किंवा कसे हे पाहणे.

(इ)सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये .

(ई )निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन



निर्णयातील सुचनांचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत भंग होणार नाही तसेच कुठलाही शासन नियम / अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे .

९(अ)सदर प्रकल्पांतर्गतच्या कामांचे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम पुर्ण झाल्यानंतरच्या कामाचे चित्र काढुन ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पांअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

उक्त अटी व शर्तीनुसार नमुद कामाबाबत खातरजमा करण्यात आलेली आहे. सदर काम यापुर्वी इतर कोणत्याही निधीतुन मागील ५ वर्षाचे कालावधीत झालेले नाही वा प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत. सबब,सदर प्रस्तवित विकास कामाच्या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | तांत्रिक मान्यता क्र.व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्र.१६ मधील थोरात घर,नजान घर, शिंदे दुकान,पठारे घर,बारगळ घर,निक्रड घर रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ३७६ दि.२२/०१/२०२५ | ४९,५८,८९६/- |
| २ | प्र.क्र.१६ मधील कांबळे घर ते खेडके घर,भोर घर ते चौधरी घर,तिरूपती बिल्डींग ते थोरात घर रस्ता कॉक्रीटीकरण करणे (कांबळे घर ते खेंडके घर व तिरूपती घर ते थोरात घर वगळता) | ३७५ दि.२२/०१/२०२५ | ४९,७५,६३५/- |
| | | रक्कम रू. | ९९,३४,५३१/- |

तरी उक्त प्रस्तावित विकास कामाचा एकुण रक्कम रू.९९,३४,५३१/- (अक्षरी रक्कम रूपये रू.नव्याण्णव लाख चौतीसहजार पाचशे एकतीस मात्र) प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडेस मंजूरीस पाठविणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२७** **दिनांक : २५ /०२/२०२५**
**विभाग** : सार्व.बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत **१.** भिस्तबाग सर्व्हे नं.१२ अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण करणे व ओपनस्पेस विकसित करणे व बंद पाईप गटार करणे. **२.**प्रभाग क्र.१ मधील माउली नगर परिसरातील बंद पाईप गटार व रस्ते कॉक्रीटीकरण करणे. **३.**दक्षतानगर,ढवन व अभय नगर भागातील व परिसरातील बंद पाईप गटार करणे,रस्ते कॉक्रीटीकरण करणे. प्रस्तावित विकास कामांचा प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचे मंजूरीसाठी सादर करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत..

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,

**संदर्भ :-**

१.नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक धोरण -१९१७/प्र.क्र.९६/न.वि.-१६ दि.१२ डिसेंबर २०१७
२.नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक धोरण -१९१७/प्र.क्र.९६/न.वि.-१६ दि.३० सप्टेंबर २०२०
३.शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.९६/१ न.वि.-१६ दि.२४ एप्रिल २०२३
४.शासन निर्णय क्रमांक मनपा -२०२३/प्र.क्र.६८३(ब-२) /नवि -१६ (ई -६६७५७९) दि.११ आक्टोबर २०२४
५.मा.आयुक्त तथा प्रशासक,मनपा,अहिल्यानगर यांचे दि.२१/०२/२०२५

विभागाने प्रस्तावित केल्यानुसार राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचया विकासासाठी विशेष अनुदान देण्यात येते याबाबतची कार्यपध्दती संदर्भातीन क्र.(१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेले आहे.अहिल्यानगर महानगरपालिकेस खाली नमुद कामांसाठी संदर्भाधिन क्र.४ नुसार रू.४००.०० लक्ष मंजुर करण्यात आलेले आहेत. यासाठी १००% निधी राज्य शासन देणार आहे.

संदर्भाधीन पत्र क्र.४नुसार योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. कामाचे स्वरूप सार्वजनिक असावे,तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरीकांच्या प्राथमिक सोर्यी सुविधांमध्ये भर पडणार आहे.याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरूपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पांतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाची सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क)सदर प्रकल्पांतर्गतच्या कामांना ई - निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. या बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(ड) सदर प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याचे उष्टीष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजुर कामावरच मंजुर निधी खर्च झाला किंवा कसे हे पाहणे.

(इ)सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये .

(ई )निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन

निर्णयातील सुचनांचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम / अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे .



८(अ)सदर प्रकल्पांतर्गत दुरूस्तीची तथा परिक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रक्ल्पांतर्गतच्या कामांचे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व कामाचे चित्र काढुन ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पांअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

उक्त अटी व शर्तीनुसार नमुद कामाबाबत खातरजमा करण्यात आलेली आहे. सदर काम यापुर्वी इतर कोणत्याही निधीतुन मागील ५ वर्षाचे कालावधीत झालेले नाही वा प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत. सबब,सदर प्रस्तवित विकास कामाच्या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | मंजूर रक्कम (लाखत) | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भिस्तबाग सर्व्हे नं.१२ अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरण करणे व ओपनस्पेस विकसित करणे व बंद पाईप गटार करणे. | १५०.०० | १,४९,९१,३८९/- |
| २ | प्रभाग क्र.१ मधील माउली नगर परिसरातील बंद पाईप गटार व रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | १५०.०० | १,४९,७४,८७६/- |
| ३ | दक्षतानगर,ढवन व अभय नगर भागातील व परिसरातील बंद पाईप गटार करणे,रस्ते कॉक्रीटीकरण करण | १००.०० | ९९,९८,८५०/- |
| | एकुण = | ४००.०० | ३,९९,६५,११५/- |

तरी उक्त प्रस्तावित ३ विकास कामाचा एकुण रक्कम रू.३,९९,६५,११५/- (अक्षरी रक्कम रूपये तीन कोटी नव्यान्नव लाख पासष्ठहजार एकशे पंधरा मात्र) प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडेस मंजूरीस पाठविणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,